**प्रेस नोट दि.३०/०३/२०१९**

**लष्कर पोलीस स्टेशन कडील चांगल्या कामगीरीची माहीती**

**मोटर सायकल मुळ मालकास परत केले बाबत.**

तक्रारदार नकुल विवेक मुळे,वय-२१,रा.साधना सहकारी हौसिंग सोसायटी,हडपसर,पुणे हे त्यांचे बँकेचे कामा करीता बॅक ऑफ इंडीयां, इंदिरा गांधी चौक, ईस्ट स्ट्रीट रोड कॅम्प पुणे,मोबाईल नं. ९५८८४३८३५२ येथे आले असतांना त्यांनी त्यांची ॲक्टीव्हा गाडी क्रं. एम एच १२ एफ एच ६६७६ ही बँकेचे पार्कींग जागेत लॉक करून पार्क करून बँकेत गेले होते. बँकेतील काम संपवून गाडी पार्क केली त्या ठिकाणी आले असता त्यांची ॲक्टीव्हा गाडी पार्क केलेल्या जागी मिळुन न आल्याने ते गाडी चोरीची तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशन येथे आले असता मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो. यांचे तोडी आदेशान्वये पो. ना २४०० शिंदे, पो.ना.११४१ ढाकणे यांना घटनास्थळी पाठविले असता, पो.ना.शिंदे, पो.ना.ढाकणे यांनी घटनास्थळी पाहणी केली असता फिर्यादी यांचे ॲक्टीव्हा सारखी निळ्या रंगाची ॲक्टीव्हा गाडी क्रं. एम एच १२ ई. एस. ५८७० ही गाडी आढळुन आली.

घटनास्थळी मिळुन आलेल्या ॲक्टीव्हा गाडी नं.एमएच/१२/ई.एस./५८७० यावरून मुळ मालकाचे नाव शोधले असता सदरची गाडी समीर किरीट शहा यांचे नावावर असल्याचे आढळुन आले. सदर नावाचे बँकेत खात आहे. अगर कसे याबाबत बँकेतील मॅनेजर यांना भेटुन बॅक खात्यांची नावावरून पडताळणी केली असता किरीट शहा यांचे बँक खाते बॅक ऑफ इंडीया मध्ये असल्याची माहीती मिळाली व सदर अकाउंटला लिंक असलेला मोबाईल नंबर मिळवून त्यावर संपर्क केला असता किरीट शहा यांचे मित्राचा कामगार नजर चुकीने एकाच रंगाच्या गाड्या असल्याने फिर्यादी यांची गाडी घेऊन स्वतःची गाडी पार्कींग मध्ये ठेवून आला असल्याचे सांगीतले व त्यास परत बँकेत बोलावून घेऊन फिर्यादी यांची ॲक्टीव्हा गाडी क्रं. एम एच १२ एफ एच ६६७६ ही त्यांना परत देण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी पो.ना.२४०० शिंदे, पो.ना.११४१ ढाकणे यांनी चंद्रकांत द.भोसले,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लष्कर पोलीस स्टेशन पुणे, यांचे मार्गदर्शना खाली केली आहे.

